# द स्टोरी ऑफ स्टफ

एखादया गोष्टीने मनाला खूप ग्रासून टाकल आहे असं तुम्हाला कधी जाणवल आहे का? मला तर माझ्याकडच्या प्रत्येक वस्तूनेच ग्रासून टाकले आहे. आपण घेतो ती प्रत्येक वस्तू कुठून येते व आपण ती फेकून दिल्यावर कुठे जाते याचा आपण कधी विचार केलाय का? मी त्याबद्यल खूप विचार केला,त्याविषयी माहिती मिळविण्याचा खूप प्रयत्न केला.काही पुस्तकातील माहितीनुसार प्रत्येक वस्तूचा प्रवास असा होतो. कच्चा माल ते निर्मिती प्रक्रिया,मग वितरण व प्रत्यक्ष वापर व कचरा होणे हा सगळा व्यवहारिक दृष्टिकोन झाला.

मी त्याबाबतीत जरा खोलात शिरले.या सगळया वस्तू येतात कुठून व जातात कुठे हे शोधण्यासाठी मी दहा वर्षे जगभर हिंडले. माझ्या असं लक्षात आले की वर सांगितलेला वस्तूचा प्रवास अपूर्णच आहे. त्यात खूप काही कमतरता आहे.

वरकरणी ही पध्दत ठाकठीक वाटते, खरंय,पण ही पध्दत आता धोक्यात आहे. ती असण्याचे कारण म्हणजे ती एकमार्गी आहे, व आपण एका सीमाबध्द ग्रहावर रहात आहोत.तिथे कुठल्याही एकमार्गी गोष्टीला अंत असणारच,ती अनंत कालपर्यंत चालणे शक्यच नाही.

या पध्दतीतील प्रत्येक प्रक्रिया आपल्या वास्तव विश्वाशी निगडीत आहे. प्रत्यक्षात ती एखादया कोऱ्या पांढऱ्या शुभ्र कागदावर घडत नसून तिचा थेट संबंध आपला समाज,आपली संस्कृती,आपली आर्थिकक्षमता आपल्या भोवतालचे वातावरण यांच्याशी येतो,व पावलोपावली ती त्यांच्या परिसिमांवर ठेचकाळते आहे.ही आकृतीच अपूर्ण असल्यामुळे त्याच्या सीमा आपल्याला दिसत नाहीत,तर आपण प्रथम ते काम करू या, त्यातील कमतरता भरून काढून काय सापडतय ते बघू या.

एक महत्वाची गोष्ट त्यात दिसत नाही,ती म्हणजे लोक, हो आपणच,या संपूर्ण प्रक्रियेत लोक मात्र महत्वपूर्ण असतात,त्यांच्याच हातात बरेच काही असते.असे लोक कोण?

त्यातील एक म्हणजे सरकार.माझ्या एका मित्राने मला सुचविले की सरकारचे प्रतिक म्हणून मी एक रणगाडा दाखवावा. हे बऱ्याच देशांबाबत सत्य आहे.कारण आपण भरलेल्या करांपैकी ५०% हूनही जास्त भाग संरक्षण विभागालाच जातो.पण मी मात्र एक माणूसच प्रतिक म्हणून दाखवत आहे. कारण कुठलेही सरकार हे लोकांनी चालविलेले,लोकांचे व लोकांसाठी असले पाहिजे हे माझे प्रामाणिक मत आहे.

आपले हीत पहाणे आपली काळजी घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. ते त्यांचे कर्तव्य आहे.

त्यानंतर येते ते कॅार्पोरेशन आता इथे कॅार्पोरेशन सरकारपेक्षासुध्दा मोठी वाटते कारण ती खरच सरकारपेक्षा मोठी आहे.जगातील सगळयात गब्बर संस्थांमधील पहिल्या शंभरात ५१ कॅार्पोरेशन आहेत. ज्या प्रमाणात या कॅार्पोरेशन्स आकारानी व सत्तेने मोठया होत आहेत त्यामानाने सरकारात फारच थोडी वाढ झालेली दिसते कारण ते लोकांच हित जपण्यापेक्षा त्यांच्या भल्याचीच काळजी वाहताना दिसतात.

आता,त्या चित्रात आणखीन काय कमी आहे ते पाहू.

एक्सट्रक्शन —उत्खनन

आपल्या ग्रहाला कंगाल करीत,नैसर्गिक संपत्तीची लुटमार करण्यालाच आजकाल एक्सट्रक्शन म्हणतात. यात काय दिसते तर मोठमोठी झाडे कापली जातायत,खनीज संपत्तीसाठी मोठमोठे डोंगर खणून नाहीसे केले जातात, पाण्याचा अतोनात वापर,प्राणीमात्रांची हत्या इ.

आपल्या ग्रहाला कंगाल करीत ,नैसर्गिक संपत्तीची लूटमार करण्यालाच आजकाल एक्स्ट्रक्शन म्हणतात.यात काय दिसते तर मोठमोठी झाडे कापली जातायत,खनीज संपत्तीसाठी मोठमोठे डोंगर खणून नाहीसे केले जातात,पाण्याचा अतोनात वापर, पाणीमात्रांची हत्या इ.

आपल्या पहिल्याच साधनसंपत्तीच्या शोधात आपण नैसर्गिक साधनसंपत्तीच ानाश करण्याची परीसिमा गाठली आहे. आपण प्रत्येक गोष्टीचा अतिरेकी वापर करीत आहोत हे ऐकायला आवडणार नाही पण हेच सत्य आहे व आपल्याला त्याचा विचार केलाचपाहिजे. गेल्या तीन दशकात मिळून एकूण निसर्ग —संपत्तीपैकी एक तृतियांश संपत्ती वापरली गेली आहे . व नष्ट झाली आहे आपल्या ग्रहावरील, संपत्तीची, कापाकापी, खणणे, उपटणे, ओरबाडणे इतक्या वेगाने चालू आहे की येथील लोकांची रहाण्यासाठी च्या मूल गरजाच आपण ओरबाडत आहोत.

यूनायटेड स्टेट्स मधे जिथे मी रहाते तिथे आधी होती त्याच्या ४ % च बंगले शिल्लक आहेत.जलस्त्रोतांपैकी चाळीस टक्के जलस्त्रोत पिण्यायोग्य राहीले नाहीत. आपण खूप वापर करत आहोत एवढीच समस्या नाही तर आपण आपल्या हीश्श्यापेक्षा खूप जास्त हिस्सा वापरतोय.

यु.एस.मधे जगाच्या ५% इतकीच लोकसंख्या आहे,पण जगातील एकूण निसर्ग संपत्तीपैकी ३०% निसर्गसंपत्ती आपणच वापरत आहोत व जगातील ३०% कचराही आपणच निर्माण करत आहोत.

तर या अमर्याद वापरासाठी आपण दुसऱ्याचा हिस्सासुध्दा वापरत आहोत.हा दुसरा म्हणजे तिसऱ्या जगातील लोक होय. थोडक्यात काय तर आपल्या गरजांसाठी आपण दुसऱ्यांच्या जमिनीवरही अतिक्रमण करीत आहोत. हीच गोष्ट कचऱ्याच्या बाबतीतही सत्य आहे.

* जगातील एकूण मासेमारीपैकी ७५% मासेमारी करून झालेली आहे याच्या परिसिमा केव्हाच ओलांडल्या गेल्या आहेत.
* जगातील एकूण जंगलापैकी ८०% जंगले नाहीशी झाली आहेत.
* एकट्या ॲमेझॉनच्या खोऱ्यातच दर मिनिटाला २००० झाडे कापली जात आहेत. याचा अर्थ प्रत्येक मिनिटाला ७ फूटबॉलच्या मैदाना इतकी जागा सपाट होत आहे.

आता इथे रहाणाऱ्या लोकांच काय? त्या लोकांच्या मतानुसार,ते जरी तिथे रहात असले तरी त्या निसर्गसंपत्तीचे ते मालक नाहीत.कारखान्यात लागणाऱ्या या कच्च्या मालाचे त्यांच्याशी देणे—घेणे नाही व त्यांना फार वस्तू विकत घ्याव्याही लागत नाहीत.या समाजात तर तुम्ही खूप काही खरेदी केली नाही तर तुम्हाला काही किंमत नसते.

निर्मिती–

या नंतर हा सर्व माल निर्मिती प्रक्रियेत समाविष्ट होतो.त्यात काय होते तर या नैसर्गिक संपत्तीमधे काही घातक रसायने मिळवून तितकेच घातक व दुषित उत्पादन बाहेर पडते.

सध्या जगात १००,००० कृत्रिम रसायने वापरत आहेत.यातील अगदी मोजकीच रसायने त्याच्या मानवी जीवनावरील परिणामासाठी तपासली गेली आहेत.पण त्यातील एकाही रसायनाचे मानवाच्या आरोग्याच्या एकंदरीत हिताच्या दृष्टीने परिक्षण झाले नाही.म्हणजेच ते इतर रसायनांच्या संयोगाने आपल्या रोजच्या व्यवहारात वापरले जातात.

आपल्याला मात्र त्यांचा आपल्या आरोग्यावर किंवा आपल्या आजूबाजूच्या वातावरणावर काय परिणाम होतो याची कल्पनाच नसते .एक गोष्ट आपल्याला नक्कीच माहित आहे ती म्हणजे घातक मधून घातक .कुठल्याही उत्पादनातही घातकपणा असणारच आपल्या घरी,शाळेत,कामाच्या ठिकाणी सगळीकडच्या वस्तूंमधे तो असणार आहेच पण आपल्या शरिरातही तो असणार आहे.

बी.एफ.आर. म्हणून ब्रोमिनेटेड फ्लम रिटार्डंट एक रसायन असते ज्यामुळे अनेक वस्तू अग्निरोधक बनवता येतात पण ते रसायन फार मोठया प्रमाणात घातक आहे.ते मेंदूवर घातक परिणाम करू शकतात. मग आपण ते का वापरत आहोत?

तरिहीते आपल्या कॅाम्प्युटरमधे ,विजेच्या उपकरणांमधे,सोफ्यामधे,गादयांमधे,उशांमधे सुध्दा वापरले जातात. आपल्या उशा मेंदूला घातक अशा रसायनात बूडवून आपण घरी आणतो व त्यावर आठ तास आपले डोके ठेवून आपण झोपतो.मला हे समजतच नाही.एवढी कार्यक्षमता असलेल्या आपल्या देशात रात्री झोपेत डोक्याजवळ आग लागू नये म्हणून दुसरा एखादा चांगला उपाय आपण का शोधू शकत नाही?

आपल्या अन्नप्रक्रियेतही घातक द्रव्य असलेले कोणते अन्न आहे माहीत आहे? ते आहे आईचे दूध.याचाच अर्थ की हे संकट आता अशा थराला पोचले आहे की आपल्या समाजातील सर्वात छोटा घटक –आपल्या बाळांनाच त्यांच्या आयुष्यभरातील घातक –विषारी रसायनांचा मारा त्यांच्या स्वतःच्या आईच्या दुधातूनच होत आहे.यापेक्षा समाजाचा ऱ्हास तो काय असणार? स्तनपान हा मुलांच्या पालनपोषणातील सर्वात मुलभूत भागच अत्यंत पवित्र,शुध्द व सुरक्षित असणे महत्त्वाचे आहे.स्तनपान हा मुलांच्या पालनपोषणातील सर्वात मूलभूत भागच अत्यंत पवित्र ,शुध्द व सुरक्षित असणे महत्त्वाचे आहे.स्तनपान करवणे चांगलेच असते व सर्व मातांनी ते केलेच पाहिजे.पण ते सुरक्षितही असले पाहिजे. सरकारनेच ही काळजी घेतली पाहिजे. पण मला वाटते ते ती जबाबदारी आपल्यावरच सोपवत आहेत.

या घातक रसायनांचा बळी ठरलेला आणखी एक वर्ग म्हणजे फॅक्टरीतले कामगार,त्यातील अनेक कोवळया वयाच्या मुली आहेत.ज्या मुलांना जन्म देण्याच्या काळात अनेक घातक रसायनांना जन्म देत आहोत.आता मी विचारते या मातृत्वाची जबाबदारी घेणाऱ्या महिलांना अशा घातक रसायनांचा सामना करत जगण्याचे काय कारण?

या सिस्टिमची ही एक खासियत आहे की,एकीकडे वातावरणाचा व आर्थिक बाजूचा ऱ्हास होत असतानाच सातत्याने लोक पुरविण्याशिवाय काही इलाजच नाही.जगातील २००,००० लोक रोज पिढयानपिढया त्यांना पोसणाऱ्या नैसर्गिक वातावरणातून

काम—धंदयाच्या शोधात शहरात येऊन झोपडपटटयांमध्ये रहात आहेत.मग ते काम कितीही हानीकारक का असेना म्हणजे आता तुम्हीच पहा या यंत्रणेत केवळ निसर्गच भरडला जात नाही तर माणसंसुध्दा भरडली जातायत.अशा रितीने सगळा समाजच रसातळाला चालला आहे.

परत तेच घातक पदार्थ आत जातात व तेच घातक पदार्थ बाहेर पडतात.कारखान्यांमधून अनेक घातक उत्पादने बाहेर पडतातच पण त्याचबरोबर काही घातक सह—उत्पादने ,वायू व प्रदुषणेही पसरतातच.हे प्रदुषण खूपच जास्त असते.यू.एस.मधील उदयोगांमधून ४ बिलियन पौंड घातक रसायने दर वर्षी बाहेर पडतात असे सांगितले जाते.प्रत्यक्षात हा आकडा बराच मोठा आहे . या बाबतीत पण लोकांच्या सहनशीलतेची परिसिमा ओलांडली गेली आहे.वर्षाकाठी ४ बिलियन पौंड घातक रसायनांचा त्रास होऊ नये म्हणून ते आणखी एक चुकीचा मार्ग वापरतात.

असे कारखाने ते दुसऱ्या देशांमधे उभारतात व दुसऱ्या कोणाच्या तरी जागेत प्रदुषण घडवतात.पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे यातील प्रदूषणाचा बराचसा भाग वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर आपल्याकडेच परत येतो.

वितरण

या सगळया साधनसंपत्तीपासून उत्पादने तयार झाल्यावर त्याचे काय करतात? त्यांचे पुढे वितरण होते.वितरण म्हणजे हा सर्व घातक दुषित माल लवकरात लवकर खपविणे.त्यासाठी किमती कमी राखल्या जातात जेणेकरून लोकांनी सतत खरेदी करीत रहावे. मग या किमती ते कशाप्रकारे कमी करतात?तर कामगारांना कमी पैसे देऊन,त्यांच्या आरोग्य विम्याच्या पैशात काटछाट करून हे खर्च परस्पर दुसऱ्या कोणाला तरी सोसावे लागतातच म्हणजे एखादी वस्तू तयार होण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष खर्च व लावलेली किंमत आपण मोजत नाही.

एक दिवस मी या सर्वांचा विचार करत होते. त्यादिवशी मी माझ्या कामाला चालले होते व मला बातम्या ऐकायच्या होत्या म्हणून मी रेडीयोच्या दुकानात रेडीयो विकत घ्यायला गेले.मला एक लहानसा छान रेडीयो ४ डॉलर व ९९ सेंटसमधे कसा भागू शकतो? त्यासाठी लागणारा धातू दक्षिण आफ्रिकेतून मिळवला असणार,पेट्रोलीयम इराकमधून काढले असणार , प्लॅस्टिक बहुतेक चीनमध्ये बनवलेले असणार व सगळयाची जुळणी मेक्सिकोमधे कंत्राटी पध्दतीने एखादया १५ वर्षाच्या मुलाने केली असणार.४ डॉ.९९पैशात तर तो रेडिओ आतापर्यंत जिथे ठेवला होता तिथल्या कप्प्याचे भाडेही भागणार नाही,किंवा स्टाफच्या माणसाचा पगारही त्यात धरला गेला पाहिजे,या सगळयासाठी लागलेला समुद्री वाहतुकीचा खर्च या सगळयांचा विचार करता त्या रेडिओची किंमत अगदीच नगण्य होती. रेडीओची खरी किंमत मी दिलीच नव्हती.

मग कोणी दिली होती?

ज्यांच्या भागातील नैसर्गिक साधन—संपत्ती वापरली गेली होती,त्यांनी ती मोजली. स्वच्छ,प्रदूषणविरहित हवेच्या कमतरतेने त्या लोकांनी ती किंमत मोजली,वाढत्या दम्याच्या व कॅन्सरच्या आजारांनी ती किंमत मोजली.कॉन्गो व त्या परिसरातील ३०% मुले शाळा सोडून कोलटॅन हा धातू वापरला जातो.स्वतःच्या आरोग्य विम्याचा खर्च भागवून ही या

लोकांनी किंमत मोजली आहे.या संपूर्ण प्रक्रियेतच लोक भरडली गेली आहेत तेव्हा कुठे तो रेडिओ मला ४ डॉलर व ९९सेंटस मधे मिळाला आहे.जगाच्या कोणत्याही खाते वहीत या लोकांच्या किमतीच्या हिश्श्याची नोंद झालेली नाही.कारखानदारांचे अनेक खर्च परस्पर कसे भागवले जातात हेच मला दाखवायचे होते.

उपयोग—

या सगळयानंतर आपण येतो त्याच्या वापराकडे.ही या प्रक्रियेचा आत्माच आहे,ही प्रक्रिया चालवणारे इंजिन आहे. या सदोष प्रक्रियेला आधार देऊन भक्कम करणारे त्याचे वापरणारेच लोक आहेत.

त्याचमुळे ९/११ नंतर संपूर्ण देश हादरला असताना प्रेसिडेंट बुशने काय करायला सांगितले असेल तर दुःख,प्रार्थना करायला नाही,आशावादी रहायला नाही तर त्यांनी शॉपिंग करायला सांगितले आपला देश हा उपभोक्त्यांचा देश झाला आहे. आपली प्राथमिक ओळखच मुळी खरेदीदार म्हणून झाली आहे. माता नाही, पिता नाही, शिक्षक नाही शेतकरी नाही फक्त उपभोक्ते. आपण किती खरेदी करतो व काय वापरतो यावरच आपली प्रथम ओळख ठरू लागली आहे. जीवनाचे मोजमाप उपभोगच आहे. मग आपणं खरेदी करतच रहातो व ही साखळी चालूच ठेवतो. ही साखळी किती चालते ?

या प्रक्रियेतील किती टक्के माल अजून उत्पादनास आहे किंवा उत्तर अमेरीकेत घेतल्यानंतर ६महीने तरी वापरात आहे ? ५० % ?२०% ? नाही चक्क ९ % फक्त १ % म्हणजेच ९९ % माल जो उत्पादन केला गेला आहे. वाहतूक केला गेला आहे व या सगळया प्रक्रियेतून गेला आहे तो फक्क ६ च महीन्यात कचरापेटीत पडतो या प्रकारे एवढया मोठया विश्वाचा कारभार कसा चालणार ?

पूर्वी असं नव्हत.अमेरिकेतील सर्वसामान्य माणूस ५० वर्षापूर्वी जेवढा वस्तूंचा वापर करत होता त्याच्या दुप्पट वापर तो आता करतो.तुमच्या आजीला विचारा—तिच्या काळी योग्य व्यवस्थान,कारभार,नैसर्गिक साधनांची समृध्दी व काटकसरीपणा या गोष्टींना खूप मोल होत.मग हे आताच अस का होतय?

तर हे सहजच होत नाही आहे.ही तर योजना आहे.दुसऱ्या विश्वयुध्दानंतर अमेरिकेची अर्थव्यवस्था कशी सुधारायची याचा विचार हे लोक करत होते.रिटेलिंग ॲनेलिस्ट व्हिक्टर लेबो यांनी यावर उपाययोजना शोधून काढली जी या पूर्ण प्रक्रियेचा सांगाडाच बनून गेली.तो म्हणाला—आपल्या उत्पादन क्षम अर्थव्यवस्थेसाठी उपभोग हा आपल्या आयुष्याचा केंद्रबिंदू बनला पाहिजे.विकत घेणे व वापरणे या गोष्टी नित्यनेमाने चालल्या पाहिजेत.आपले आत्मिक समाधान,आपले मानसिक समाधान आपण उपभोगात वस्तू शोधले पाहिजे. वस्तू विकत घेणे,वापरणे,फेकणे,दुसऱ्या घेणे व परत त्याही फेकणे हे सर्व कायमच गतीने चालत राहिले पाहिजे.

प्रेसिडेंट इसेनहोवरच्या कौन्सिलवरिल अर्थव्यवस्थेच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणाले की, “अमेरिकन अर्थशास्त्राचा अंतिम पर्याय हा जास्तीत जास्त वस्तूंचे उत्पादन करणे हेच राहिल.”

भरपूर उत्पादन हा अर्थशास्त्रातील अंतिम उपाय आहे का?

लोकांना आरोग्य—सुविधा पुरविणे नाही,शिक्षण नाही,सुरक्षित वाहतूक नाही ,प्राथमिक गरजा नाहित,न्याय नाही फक्त उत्पादन.

या प्रवाहात त्यांनी सगळयांनाच कसे ओढून घेतले?

त्यासाठी दोन परिणामकारक धोरण त्यांनी अवलंबिली.एक योजनाबध्द नाशवंत वस्तू तयार करणे व दुसरे समजून उमजून बाजूला टाकणे.पहिल्या प्रकारात त्याची रचनाच अशी असते की ते लवकर कचरापेटीत कसे जाईल याचा विचार केला जातो. उत्पादन जास्तीत जास्त हलक्या प्रतीचे कसे होईल जेणेकरून ग्राहक लवकरच ते फेकून देऊन नवे खरेदी करेल ही पुरेपुर काळजी घेतली जाते.प्लॅस्टिकच्या पिशव्या किंवा कॉफीचे कप या बाबतीत एकवेळ ठीक आहे,पण आता अनेक मोठया वस्तूंबाबतही उदा. डी.व्ही.डी.,कॅमेरा,शेगडया इ.वस्तूही यातच मोडतात.

अगदी कॉम्प्युटर सुध्दा!आपण नवा कॉम्प्युटर घेतो तेव्हा एक गोष्ट तुमच्या लक्षात आली आहे का? तंत्रज्ञान इतके झपाटयाने बदलत आहे की आताचे नवे कॉम्प्युटर जे संपर्काचे मुख्य साधन बनले आहेत व सारखे नवनवे येत आहे म्हणून उत्सुकतेपोटी मी एक मोठा डेस्क टॉप कॉम्प्युटर उघडून पाहिला. माझ्या असे लक्षात आले की,दरवर्षी नवीन बनवताना त्यातील फक्त एक छोटासा भागच बदलला जातो.पण तुम्ही तेवढाच एक भाग बदलू शकत नाही,कारण येणारे प्रत्येक मॉडेल वेगळया आकाराचे असते.त्यामुळे तुम्हाला संपूर्ण कॉम्प्यूटरच फेकून दयावा लागतो.व संपूर्णच नवीन घ्यावा लागतो.

१९५०च्या सुमारास या जगातील योजनाबध्द कंडम माल बनविण्याचे जोरात चालू होते,तेव्हाचे औदयोगिक डिझाइन जरनल मधील काही वाक्ये मी वाचली.हे डिझायनर हे उघडपणे जाहीर करतात.वस्तू लवकर कशी मोडीत निघेल,या तऱ्हेची बनेल हे ते आपसात चर्चा करून ठरवितात,तरिही त्या उत्पादनाविषयी ग्राहकाला विश्वास निर्माण झाला पाहिजे व त्याने नवी वस्तू खरेदी केली पाहिजे.हे सगळे मुददाम घडवून आणले जाते.

पण ज्या वस्तू खूप लवकर निकालात निघत नाहीत त्यांच्यासाठी असे उपाय आहेत की वस्तूचा उपयोग शिल्लक असतानासुध्दा ती फेकून देऊन दुसरी घेण्याची इच्छा होणे–निर्माण करणे हे सर्व जाणून बुजून केले जाते.

हे कसे साध्य होते?तर वस्तूचे बाहय स्वरूप बदलवले जाते.त्यामुळे तुम्ही एखादी वस्तू काही दिवसापूर्वी खरेदी केलेली असेल असेल तर तुम्ही आधुनिकतेच्या प्रवाहात समाविष्ट नाही आहात हे कोणीही सांगू शकेल,कारण त्यावरच तर तुमची समाजातील पत ठरत असते हे कोणीही सांगू शकेल,कारण त्यावरच तर तुमची समाजातील पत ठरत असते.हे सर्व नामुष्कीचे आहे.

माझ्याकडे माझा जुना जाड –जूड कॉम्प्युटर होता.मी तो ५वर्ष वापरत होते.माझ्या बरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्याने नवा कॉम्प्युटर घेतला होता.त्या कॉम्प्युटरला शोभेसा छान चपटा,चकचकीत स्क्रीन असलेला मॉनिटर होता.एवढेच काय त्याला हुबेहुब साजेसा तिचा फोन होता व पेनस्टॅंडसुध्दा त्याला मॅचिंग होता.ती एखादया स्पेस–शिपमधे बसली आहे व मी मात्र एक भले मोठे वॉशिंग मशीन टेबलवर ठेऊन बसले आहे असेच वाटत होते.

एखादी फॅशन हे याचे ठोक उदाहरण आहे.बायकांच्या बुटाच्या टाचा एखादया वर्षी चांगल्या उंच असतात तर पुढच्या वर्षी सपाट असतात.यात आरोग्याच्या दृष्टीने काय चांगले हा विचार नसतो तर फॅशनचाच प्रवाह असतो.फॅशनप्रमाणे तुम्ही बदलत नसाल तर बाजुच्या फॅशन पाळणाऱ्या माणसाच्या तुलनेत तुम्हाला कमी लेखले जाते.त्यामागे हेतू एकच नवीन जोडे खरेदी करत रहा.

या सगळयात विविध प्रसार माध्यमे व जाहिरातदार यांचा मोठा वाटा आहे.आज यु.एस मधील प्रत्येकजण दररोज जवळजवळ ३,०००जाहिरातींना सामोरे जात आहे.

पन्नास वर्षापूर्वी एखादया माणसाने आयुष्यभरात जेवढया जाहिराती पाहिल्या असतील त्याच्या पेक्षाही जास्त जाहिराती आपण वर्षभरात पाहतो.नीट विचार केला तर आपल्याला दुःखी करण्यापलिकडे जाहिराती काय काम करतात?दिवसातून ३००० वेळा त्याआपल्याला आपले कसे कसे खराब आहेत,आपली गाडी खराब आहे व या सगळया खराबचे सुंदर मधे रूपांतर होईल आपण शॉपिंगला गेला तर! या सगळयाला प्रसारमाध्यमे सुध्दा हातभार लावतात.आजच्या काळातली एकमेव गोष्ट म्हणजे शॉपिंग.त्यासाठी लागणारे उत्पन्न,निर्मिती,व त्याचे टाकाऊ होणे सर्व आपण दृष्टिआड करतो.

आपल्या देशात पूर्वी कधीही नव्हता एवढा वस्तूंचा सुकाळ आहे, पण सर्वसाधारण माणसाचे सुख मात्र हरवत चालले आहे.१९५० च्या सुमारास आपले राष्ट्रिय स्वरूप जसे होते ते वस्तूंचा वापर वाढत गेला तसतसे बदलतच गेले आहे.

कारण असे की आपल्याकडे वस्तू खूप आहेत पण आपल्याला खरंच आनंद देऊ शकतील अशा गोष्टींसाठी वेळच कमी आहे उदा. आपले कुटूंब,आपले मित्र व फावळावेळ.पूर्वीपेक्षा आपण जास्त कष्ट करत आहोत,तर्कशास्त्र सांगते की,आपल्याला गरीब कष्टकरी लोकांपेक्षा कमी वेळ मोकळा मिळतो.

आणि जो काही मोकळा वेळ मिळतो तेव्हा आपण मुख्यत्वे दोन काम करतो.कोणती माहित आहे?टि.व्ही.बघणे व शॉपिंग करणे.आपण यु.एस.मधील लोक युरोयिन लोकांपेक्षा ३–४ पट जास्त तास शॉपिंग करत असतो.

आपण सर्वजण विचित्र परिस्थितीत सापडलेलो आहोत.आपण दिवसभर कामाला जातो,घरी येतो तेव्हा आपण दमलेलो असतो.म्हणून आपण आपल्या नव्या सोफ्यात बसकण मारतो व टि.व्ही.बघत बसतो.त्यातील जाहिराती तुमचं शोषण करतात,तुम्हाला चांगल वाटण्यासाठी एखादया मॉलला जाऊन शॉपिंग करा अस सांगण्यात येत.या सगळया शॉपिंगचा खर्च भागविण्यासाठी मग भरपूर काम कराव लागत.आपण आणखी दमतो व घरी येऊन परत टि.व्ही. पहात बसतो.परत शॉपिंगचा मोह आपण आवरू शकत नाही.या दुष्टचक्रात आपण बेमालूमपणे अडकून पडतो.

विल्हेवाट

शेवटी सतत खरेदी केलेल्या या सर्व वस्तूंचे काय होते?ज्या प्रमाणात खरेदी केली जाते त्या प्रमाणात ते आपल्या घरांमधे मावतही नाही. तरी १९७० नंतर यु.एस मधल्या घरांचा आकार जवळ–जवळ दुप्पट झाला आहे.मग सर्व वस्तू थोडयाच दिवसात कचऱ्यात जमा होतात.या सगळया कचऱ्याची विल्हेवाट लावायची कशी? याची जबाबदारी कोणीच घेत नाही.यु.एस.मधील प्रत्येक माणूस ४½ पौंड कचरा रोज तयार करतो.तीस वर्षापूर्वी आपल्यापैकी प्रत्येकजण जेवढा कचरा तयार करत असे त्याच्या हा दुप्पट आहे.

हा सर्व कचरा जमिनितील मोठमोठे खडडे बुजविण्यासाठी वापरला जातो.जर अशी जागा मिळालीच तर तो भटटीत जाळला जातो,व मग खडडयांमधे भरला जातो.या दोन्ही गोष्टींमुळे हवा,जमीन,पाणी प्रदुषित होत रहाते व वातावरणच बदलून जाते.

कचरा जाळणे खरच वाईट असते.निर्मिती प्रक्रियेत ज्या विषारी घातक पदार्थांचा वापर केला गेला आहे तो जाळण्यामुळे ते घातक पदार्थ वायूत मिसळतात.कधी कधी त्यांचे

रूपांतर अधिक जहाल घातक वायूत मिसळतात. कधी कधी त्यांचे रूपांतर अधिक जहाल घातक वायूत होते उदा० डायोक्सिन

डायोक्सिन हा माणसाला माहित असलेला सर्वात जास्त घातक पदार्थ आहे.व या भटटया या पदार्थांच्या सर्वात मोठया निर्मात्या आहेत.याचाच अर्थ हे थांबविण्यासाठी आपण कचरा जाळणे बंद केले पाहिजे.हे काम आपण ताबडतोब करू शकतो.

काही कंपन्यांना हे खडडे भरणे किंवा भटटयात जाळणे ही काहीच जबाबदारी घ्यायची नसते.मग ते काय करतात तर या कचऱ्याची सुध्दा निर्यात करतात.

रिसायक्लिग म्हणजेच कचऱ्यातून परत उपयुक्त वस्तू बनविण्याचे काय?याचा उपयोग होतो का?तर नक्कीच होतो.रिसायक्लिंगमुळे कचरा कमी होतोच पण खाणींवरचा भार व नवीन कच्चामाल उपलब्ध करण्याचा त्रासही कमी होतो. आपण सर्वांनी नक्कीच हे काम केले पाहिजे.पण तरीही रिसायक्लिग पुरेसे नाही.त्याने पूर्ण प्रश्न सुटतच नाही.

कारण एक म्हणजे आपल्या घरांतून निर्माण होणारा कचरा अगदी हिमनगाच्या टोकाइतकाच असतो.पण आपल्या घरातून बाहेर पडणाऱ्या एक टोपलीभर कचऱ्याची विल्हेवाट लावताना त्याच्या कितीतरी पट प्रदुषित घटक तयार होतात.तर मग आपल्या घरातील १००% कचरा आपण रिसायकल का करत नाही? मग हा प्रश्नच शिल्लक राहणार नाही.

बराचसा कचरा रिसायकल होऊ शकत नाही कारण एक तर त्यात बरेच घातक घटक तरी असतात किंवा ते रिसायकल होऊ शकणार नाहीत असेच बनलेले असतात.उदा.ज्युस साठी वापरले जाणारे पॅकेटस ज्यात धातूचे पातळ तक्ते,पेपर व प्लॅस्टिक यांचे घर एकमेकांवर इतके पक्के बसवलेले असतात की ते वेगळे होऊच शकत नाहीत, त्यामूळे त्यांचे रिसायक्लिंग होऊ शकत नाही.

थोडक्यात काय ही सगळी यंत्रणाच सध्या मोठा प्रश्न होऊन बसला आहे.सर्व अडथळयांवर मात करण्याचा प्रयत्न करत आपण त्याच्याशी झुंजतो आहोत.तरीही हवामान बदलत चाललाय,माणसाच सुख कमी कमी होतय,कशाचाच फारसा उपयोग होत नाही.

सर्वदूर आढळणाऱ्या या प्रश्नामधे एकच चांगली गोष्ट आहे,ती म्हणजे यात अनेक प्रकारे मार्ग निघू शकतो.इथे काही लोक जंगलसंपत्ती वाचवण्याचा अतोनात प्रयत्न करताना दिसतात तर काही या वस्तूंच्या निर्मितीच्या प्रक्रियेत दखल देऊन त्यातील त्रुटी दुर करण्याचा प्रयत्न करतात.कामगाराच्या हक्कांबाबत लढा देणारे लोक आहेत तर घातक पदार्थ असलेल्या वस्तू वापरण्यावर बंदी आणून,कचऱ्याची विल्हेवाट खडडयांमधून व भटटयांव्दारे न करता योग्य पर्याय शोधायला मदत करणारे लोकआहेत.ते सरकारी यंत्रणेत जागरूकता आणण्याचाही प्रयत्न करताहेत.जेणे करून सरकार लोकांचे व लोकांसाठी काम करेल.

या सगळयाच गोष्टी खूप महत्वाच्या आहेत,पण जेव्हा ते सर्वजण एकत्रितपणे काम करतील तेव्हाच एखादे मोठे चित्र उभे राहिल.या यंत्रणेमागील सर्व लोक एकजुटीने काम करतील तेव्हाच सध्याच्या अधोगतीला पायबंद बसेल व काही चांगले घडताना दिसेल.मग साधनसंपत्ती किंवा मानवी संपत्ती यांचा विनाकारण नाश होणार नाही.

काही पर्याय

यासाठी आपला जुना टाकून देण्याचा स्वभाव आपण बदलला पाहिजे.नव्या विचारप्रणालीनुसार वस्तूच्या टाकाऊपणापेक्षा टिकाऊपणावर भर दिला गेला

पाहिजे.प्रदुषणविरहित रासायनिक प्रक्रिया,शून्य कचरानिर्मिती,नवीन उत्पादन तंत्रज्ञान,पुनःनिर्माण होणारी उर्जा,समाजाचे प्रबोधन या सगळया गोष्टी चालू आहेत.

हे फार आदर्शवादी आहे.हे खरे न होणारे स्वप्न आहे असे काहीजण म्हणतात पण जुन्या सवयींमधे अडकून पडून जुन्याच वाटा चोखाळणारेच खोटे आहेत.लक्षात ठेवा की हा प्रश्न व या जुन्या वाटा आपोआप निर्माण झाल्या नाहीत.हे काही गुरूत्वाकर्षण नाही जे निसर्गदत्त आहे. तर हा प्रश्न लोकांनी तयार केलेला आहे.तर मग आपणच त्यातून मार्ग काढला पाहिजे व नवीन वाटा तयार केल्या पाहिजेत.